**स्वातंत्र्य सैनिकांनी किंवा त्यांच्या वारस विधवा पत्नी वा विधुर पती यांनी केलेले नामनिर्देशन त्यांच्या मृत्यूनंतर रद्द करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय, क्रमांकः स्वासैक-१४१३ /प्र.क्र.२२८/१६-अ** (#)

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

तारीख: २८ फेब्रुवारी, २०१४.

**वाचा:**

१) **शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीएनएस-१०८७/४९९ / के.नं.१२/१६-अ, दिनांक ०४.०३.१९९१.**

२) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीएनएस-१०१०/१५०/प्र.क्र.६८/१०/१६-अ, दिनांक २९.०५.२०१०.**

**प्रस्तावना :-**

शासन परिपत्रक दिनांक ०४/०३/१९९१ अन्वये स्वातंत्र्य सैनिकास/त्याच्या नामनिर्देशीत पाल्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील वर्ग ३ व वर्ग ४ च्या पदांवर शासन सेवेत नियुक्तीकरिता पसंतीक्रम देण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २९/५/२०१० अन्वये स्वातंत्र्य सैनिकाने त्याच्या हयातीत केलेले नामनिर्देशन त्याच्या मृत्यूनंतर एकदाच बदलण्याचे अधिकार त्याच्या विधवा वारस पत्नीस प्रदान करण्यात आले आहेत.

मा.उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ७९५५/२००६, श्री.सचिन एस. हुंडेकरी वि. महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणी दिनांक २१/११/२०११ रोजी आपला निर्णय देतांना असे निदेश दिले आहेत की, स्वातंत्र्य सैनिकाच्या विधवा पत्नी यांना जवळच्या किंवा विहीत नातेसंबंधातील व्यक्तींना शासकीय सेवेत नोकरी मिळण्यासाठी नामनिर्देशित करण्याचा अधिकार देण्यामागील मूळ उद्देश त्या पाल्यांनी विधवांचे पालनपोषण करणे असा आहे. जर स्वातंत्र्य सैनिक किंवा त्याची वारस विधवा पत्नी वा विधुर पती हयात नसेल तर त्यांचे पालनपोषण करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदर योजनेचा मूळ उद्देश हा स्वातंत्र्य सैनिक अथवा त्यांची पत्नी यांच्या हयातीत त्यांचे पालनपोषण व्हावे असा असल्यामुळे व त्यांच्या हयातीनंतर त्यांचे पालनपोषण करण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याने त्यांनी केलेले नामनिर्देशन त्यांच्या मृत्यू पश्चात अस्तित्वात राहणार नाही, असा निर्वाळा मा.उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई यांनी दिला आहे.

सदर न्यायनिर्णयानुसार हयात नसलेल्या स्वातंत्र्य सैनिकांनी किंवा हयात नसलेल्या त्यांच्या वारस विधवा पत्नी वा विधुर पती यांनी केलेले नामनिर्देशन रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे:-

**शासन निर्णय :-**

जे स्वातंत्र्य सैनिक तसेच त्यांची वारस विधवा पत्नी वा विधुर पती आता हयात नाहीत, त्यांनी

केलेले नामनिर्देशन अस्तित्वात राहणार नाही. त्यामुळे जे स्वातंत्र्य सैनिक वा त्यांची वारस विधवा पत्नी वा विधुर पती आता हयात नाहीत अशा स्वातंत्र्य सैनिकांनी किंवा त्याच्या वारस विधवा पत्नी वा विधुर पती यांनी नामनिर्देशित केलेल्या पाल्यास अद्याप शासकीय सेवेत स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य म्हणून नियुक्ती मिळाली नसेल अशा पाल्यांचे नामनिर्देशन रद्द समजण्यात यावे.

त्यानुसार सर्व जिल्हाधिकारी यांनी आता हयात नसलेले स्वातंत्र्य सैनिक किंवा त्याच्या हयात नसलेल्या वारस विधवा पत्नी वा विधुर पती यांनी केलेले नामनिर्देशनाप्रमाणे त्याचे नामनिर्देशित पाल्य यांना अद्यापपर्यंत सदर नामनिर्देशनाच्या आधारे शासन सेवेत प्रवेश मिळाला नसेल असे मूळ नामनिर्देशन पत्र रद्द करण्यासाठी संबंधित नामनिर्देशित पाल्यांकडून परत मागवून व ते रद्द करुन आपल्या अभिलेखात जमा करावे व तशी नोंद संबंधित नोंदवहीत घ्यावी.

या शासन निर्णयापूर्वी ज्या स्वातंत्र्य सैनिक किंवा त्याची वारस विधवा पत्नी वा विधुर पती यांनी नामनिर्देशन केलेल्या त्याच्या पाल्यास सदर नामनिर्देशनाच्या आधारे शासकीय/निमशासकीय सेवेत नोकरी मिळाली असेल त्यांच्या बाबतीत प्रस्तुत आदेश लागू होणार नाहीत. तसेच त्यांच्या नियमित सेवेवर या आदेशाचा कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

सर्व जिल्हाधिकारी यांनी सदर कार्यवाही या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसात पूर्ण करावी. विहित करण्यांत आलेली सदर कालमर्यादा कटाक्षाने पाळण्यात येईल याची जिल्हाधिकारी यांनी स्वत: खबरदारी घ्यावी.

हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानीत संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचा अधिकार शासनाला आहे अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१४०२२८१२३११११३००७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DINGLE DINESH R

Digitally signed by DINGLE DINESH R
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=DINGLE DINESH R
Date: 2014.03.01 15:28:26 +05'30'

(दि.रा.डिंगळे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.विरोधी पक्षनेता,विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२,

२) सर्व सन्माननीय विधान परिषद /विधानसभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य,